**विशेष केंद्रीय सहाय्ययोजने अंतर्गत “Setting up Libraries in Ashram Schools” या योजनेच्या मार्गदर्शक तत्वांना मंजूरी देणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः विकेंस-२०१८/प्र.क्र.६३/का-१९**
मंत्रालय, मुंबई ४०००३२
तारीख: ०९/०५/२०१८

**संदर्भ-**

1. **जनजाती कार्य मंत्रालय,नवी दिल्ली यांचे पत्र क्र.F.No.११०१५/०५/२०१७-TSP, दि.३०/०५/२०१७**
2. **शासन निर्णय क्रमांक: केंद्रिय-२०१६/प्र.क्र.६४/ का.-१९, दि.२१/०३/२०१७**
3. **शासन निर्णय क्रमांकः केंद्रिय-२०१७/प्र.क्र.४५/का.-१९, दि. १९/०८/२०१७**

**प्रस्तावना -**

विशेष केंद्रीय सहाय्य योजनेअंतर्गत योजनेअंर्तगत केंद्र शासनाने सन २०१७-१८ करीता Setting up Libraries in Ashram Schools या योजनेकरिता ३००.०० लक्ष निधी मंजूर केलेला आहे. सदर निधी संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयान्वये आयुक्त आदिवासी विकास, नाशिक यांना वितरीत करण्यात आला आहे. या योजनेची अंमलबजावणी आदिवासी विकास विभाग व एकलव्य फाऊंडेशन या दोघामध्ये सामंजस्य करारानुसार (MOU) होणार आहे. एकलव्य फाऊंडेशने यापुर्वी मध्यप्रदेश शासनासोबत Social Science Teaching Programme व Primary Education Programme (PRASHIKA) in government School व National Council of Education Research and training (NCERT) यांचे सोबत Developing the National Curriculum Framework (NCF) २००५ व Syllabuses and textbooks based on the NCF या कार्यक्रमांमध्ये यशस्विरीत्या काम केले आहे. तसेच एकलव्य फाऊंडेशन या संस्थेमार्फत बिहार, छत्तीसगड, राजस्थान, केरळ या राज्यामध्ये वरील कार्यक्रम राबविले असून व आंधप्रदेश सरकारसोबत ही संस्था State Councils of Educational Research and training मध्ये पाठ्यक्रम व पाठ्युपुस्तके तयार करण्याच्या कामामध्ये सहाकार्य करीत आहे. या व्यतीरीक्त एकलव्य संस्थेचे स्वत: शिक्षकांच्या सबलीकरण व शिकवण्याच्या प्रक्रीयेमध्ये बदल करून वाढ करण्याच्या दृष्टीने कार्यशाळा आयोजित केल्या आहेत व या अनुषंगाने एक लहान प्रमाणित अभ्यासक्रम देखील सुरू केला आहे. या प्रकारे शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी व विद्यार्थ्यांना त्यांच्या मातृभाषेमध्ये विज्ञानाचे ज्ञान होण्यासाठी बरीच पुस्तके हिंदी, मराठी सारख्या प्रचलित भाषेमध्ये भाषांतराव्यतीरीक्त गोंडी, कोरकू, मालवी, मुंडेरी सारख्या आदिवासी भाषांमध्ये देखील भाषांतर केली असल्याने अशा नावजलेल्या व या क्षेत्रामध्ये कामाचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या या संस्थेमार्फत Setting up Libraries in Ashram Schools ही योजना राबविण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचनांना मंजूरी देण्याचे प्रस्तावित आहे.

**शासन निर्णय-**

आश्रमशाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांना विज्ञानाचे ज्ञान उपलब्ध करून देण्याच्या कार्यक्रमार्तगत “Setting up Libraries in Ashram Schools” ही योजना एकलव्य फाउंडेशन व आदिवासी विकास विभाग यांच्यामार्फत संयुक्तपणे राबविण्यासाठी एकुण रु.३००.०० किंमतीच्या अंमलबजावणीच्या मार्गदर्शक सूचनांना या निर्णयाद्वारे सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्रमांक १ नुसार मंजूरी प्रदान करण्यात येत आहे

२. सदर योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार वितरीत तरतूदींच्या मर्यादेत योजना राबविण्याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात यावी व त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र आर्थिक व भौतिक अहवालासह शासनास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५१०१११८३७७६२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ajitsingh R
Rajput

Digitally signed by Ajitsingh R Rajput
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=TDD Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a614ce75be611413980d3efebe7cde81ad571ab119e8360b7b526b5159edd099, serialNumber=32168d31c7d800af039db3657f6a01d233033f3f7c16b7ca135b2c868025eb3e, cn=Ajitsingh R Rajput
Date: 2018.05.10 11:19:48 +05'30'

(अ.रा.राजपूत)
कार्यासन अधिकारी

**प्रत,**

१. मा.मंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय,मुंबई
२. मा.राज्यमंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. प्रधान सचिव,आदिवासी विकास यांचे स्वीय सहायक,मंत्रालय,मुंबई
४. आयुक्त,आदिवासी विकास,महाराष्ट्र राज्य,नाशिक.
५. सहसचिव/ उपसचिव,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
६. अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती, नागपूर , नाशिक व ठाणे.
७. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
८. एकलव्य फाऊंडेशन, भोपाळ
९. संगणक समन्वयक,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
१०. निवड नस्ती (का.१९) आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई

## विशेष केंद्रीय सहाय्य योजना - सन २०१७-१८
## परिशिष्ट-१

**(रुपये लाखात)**

<table>
<tr><td>१.</td><td>योजनेचे नाव</td><td>Setting up Libraries in Ashram Schools</td></tr>
<tr><td>२.</td><td>योजनेचे प्रस्तावित लाभ क्षेत्र</td><td>४०० आश्रमशाळा (अपर आयुक्त, अमरावती, नागपूर, नाशिक व ठाणे)<br>( प्रत्येकी १०० आश्रमशाळा )</td></tr>
<tr><td>३.</td><td>वित्तीय तरतूद</td><td><table><tr><td>अ.क्र.</td><td>वर्ष</td><td>योजना</td><td>निधी (रू.लक्ष)</td></tr><tr><td>१</td><td>२०१७-१८</td><td>Setting up Libraries in Ashram Schools</td><td>३००.००</td></tr></table></td></tr>
<tr><td>४.</td><td>या योजनेत येणारे खर्चाचे अंदाजपत्रक</td><td>एकूण खर्च रु.३००.०० लक्ष</td></tr>
<tr><td>५.</td><td>योजना राबवणारी यंत्रणा</td><td>एकलव्य फाऊंडेशन, भोपाळ व आयुक्त, आदिवासी विकास नाशिक</td></tr>
<tr><td>६.</td><td>नियंत्रक अधिकारी</td><td>आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक व प्रकल्प मुल्यमापन व संनियंत्रण समिती</td></tr>
<tr><td>७</td><td>योजनेचा उद्देश/ हेतु</td><td>➢ विज्ञान विषयक अभ्यासक्रम लक्षात घेवून आश्रमशाळांमधील ग्रंथालयाचे बळकटीकरण करून त्यांना अद्यावत व सुसज्ज करणे.<br>➢ शिक्षकांसाठी व विद्यार्थ्यांसाठी छापील मुद्रण सामग्री तयार करणे व शाळेच्या स्तरावर वाटप करणे (विज्ञानकार्यपुस्तिका, विज्ञान पूरक वाचन साहित्य , शिक्षक साहित्य, व इतर साहित्य)<br>➢ उपलब्ध असलेल्या हिंदी व इंग्रजी भाषेतील विज्ञान साहित्याचे भाषांतर करणे (बालवैज्ञानिक कार्य पुस्तिका) व आश्रम शाळेच्या स्तरावर वाटप करणे<br>➢ शिक्षकांसाठी पुस्तकांची मालिका(मार्गदर्शक पुस्तिका) विकसित करणे<br>➢ विज्ञान विषयावरील वेगवेगळ्या बाबींवर पोस्टर्स तयार करणे<br>➢ प्रत्येक तिमाहीत शिक्षकांसाठी वृत्तपत्र (newsletter) तयार करणे व सर्व आश्रम शाळेमध्ये वितरीत करणे</td></tr>
<tr><td>८</td><td>योजना अंमलबजावणीची कार्यपध्दती</td><td>१. सदर योजना राबविण्याबाबतचे सविस्तर अंदाजपत्रक व वर्षनिहाय कालबद्ध कार्यक्रम, एकलव्य फाऊंडेशन, भोपाळ या संस्थेसोबत शासनाशी होणारा सामंजस्य करारात नमुद करण्यात आला आहे. या कार्यक्रमांनुसार सदर योजनेची अंमबलजावणी करण्याची जबाबदारी संयुक्तपणे आदिवासी विकास विभाग व एकलव्य फाऊंडेशनची राहील.<br>२. योजनेच्या अंमलबजावणीची सुरुवातीचा पहीला टप्पा अमरावती विभागातील धारणी प्रकल्प कार्यालयातील निवडक आश्रमशाळांमध्ये सुरु करण्यात आला आहे .</td></tr>
</table>

३. पहिला टप्पा नोव्हेंबर २०१७ ते मार्च २०१८ या कालावधीमध्ये अपर आयुक्त, अमरावती यांचे कार्यक्षेत्रामध्ये राबविण्यात आला .

४. दुसऱ्या टप्प्यात अपर आयुक्त, नाशिक,नागपूर ठाणे यांचे कार्यक्षेत्रातील आश्रमशाळांमध्ये अंमलबजावणी सुरु आहे . ( एप्रिल २०१८ - मार्च २०२१)

<u>अंमलबजावणीची कार्यपद्धती-</u>

१. सदरचा कार्यक्रमाबाबत ओळख करुन देऊन या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसंदर्भात त्यांचे मत जाणून घेण्यासाठी सर्व मुख्याध्यापक, विस्तार अधिकारी यांची प्रकल्प स्तरावर प्रत्येक महिन्याला बैठक घेण्यात येईल.

२. गट स्तरावरील मासिक बैठका व शाळा भेटी/ आढावा-
सर्व आश्रमशाळांमधील विज्ञान शिक्षकांचे निवासी प्रशिक्षण झाल्यानंतर विज्ञान उपकरणे व त्याबाबत पुस्तके यांचे वितरण दोन महीन्याच्या आत शाळेच्या स्तरावर करण्यात येईल. शिक्षकांनी प्रत्यक्ष शाळेमध्ये शिकवण्यास सुरवात केल्या नंतर त्यांना येणाऱ्या अडचणी, प्रश्न यांचे निराकरण करण्यासाठी गट स्तरावर मासिक बैठका घेण्यात येतील. तसेच यासाठी एकलव्य संस्थेमार्फत क्षेत्रीय स्तरावरील प्रतिनिधीमार्फत (FSPs) कार्यक्रमाचे नियोजन शाळेमध्ये वर्ग निहाय प्रात्यक्षिक दाखविणे, विज्ञान साहीत्याची रचना इ.बाबत शिक्षकांना सहाय्य उपलब्ध करून देण्यात येईल.

३. विज्ञान अभ्यासिकांची निर्मिती करणे-
एकलव्य संस्थेची विज्ञानाकरीता “कबाड से जुगाड” या संकल्पनेचा वापर करून सद्यस्थितीत आश्रमशाळांमध्ये असलेल्या ग्रंथालयासोबत विज्ञानाची पुस्तके विद्यार्थी व शिक्षकांना उपलब्ध करून दिली जातील. ज्या शाळांमध्ये ग्रंथालय नसेल तेथे अशाप्रकारच्या विज्ञान पुस्तकांद्वारे ते सूरू करण्यात येईल.

४. विज्ञान संवादासाठी संकेतस्थळाची निर्मिती करण्यात येईल.

५. शिक्षकांसाठी व विद्यार्थ्यांसाठी विज्ञान पूरक साहित्य, कार्यपुस्तिका , शिक्षक मार्गदर्शन साहित्य, इतर वाचन साहित्य एकलव्य संस्थेच्या मदतीने तयार करण्यात येईल व वितरीत करण्यात येईल .

६. उपलब्ध असलेल्या हिंदी व इंग्रजी भाषेतील विज्ञान कार्यपुस्तिका व इतर साहित्य यांचे मराठीत भाषांतर करून आश्रम शाळा स्तरावर वाटप करण्यात येईल

७. शाळेच्या स्तरावर विज्ञान शिक्षणा सबंधित अनुकूल वातावरण तयार होण्यासाठी विज्ञान सबंधित पोस्टर्स तयार केले जातील तसेच विद्यार्थांनी तयार केलेले पोस्टर्स शाळेतील भिंती, इतर मोकळ्या जागा, वर्ग खोल्या यांठिकाणी लावण्यात येईल.

८. शिक्षकांसाठी तयार केलेले लेख ,टिपण्या,नोंदी यांचे एकत्रीकरण करून मार्गदर्शक पुस्तिका तयार करण्यात येईल .

९. प्रत्येक तिमाहीत विज्ञान विषयाबाबत झालेले कार्य , नाविन्य पूर्ण माहिती , शिक्षकांनी राबविले उपक्रम या बाबत शिक्षकांसाठी वृत्तपत्र (newsletter) प्रदर्शित केले जाईल व प्रत्येक आश्रम शाळेला वितरीत केले जाईल .

| | | |
|---|---|---|
| ९ | योजनेचे संनियंत्रण व मुल्यमापन | १) आधाररेखा सर्वेक्षण - २,३ प्रकल्प कार्यालयांमधल्या, शाळांमधल्या विज्ञान शिक्षणाच्या पद्धती, उपलब्ध असलेले विज्ञान साहित्य ,विज्ञान माहिती पुस्तके, शिक्षकांसाठी उपलब्ध असणारे साहित्य इत्यादींची सद्यःथिती तपासून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करून एक अहवाल तयार करण्यात येईल व आदिवासी विकास विभागाला पाठवला जाईल. हा अहवाल अंतिम परिणाम मूल्यांकनासाठी आधाररेखा म्हणून वापरण्यात येईल.<br>२) योजनेसाठी MIS ची निर्मिती करण्यात येईल.<br>३) वार्षिक अहवाल - ४ ATC चे अहवाल एकत्र करून एक वार्षिक अहवाल तयार करण्यात येईल.<br>योजनेचे संनियंत्रण व मुल्यमापनकरीता पुढीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे<br>१ आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक - अध्यक्ष<br>२ श्री. उर्जित याज्ञीक, आय आय टी मुंबई -सदस्य<br>३ श्री. भास बापट, आय आय एस ई आर, पुणे -सदस्य<br>४ श्रीमती विनिता बाळ, आय आय एस ई आर, पुणे -सदस्य<br>५ श्री.सत्यजित राथ, आय आय एस ई आर, पुणे -सदस्य<br>६ श्रीमती एल. एस. शशिधरा, आय आय एस ई आर, पुणे -सदस्य<br>७ संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास -सदस्य सचिव<br>८ संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, -सदस्य<br>९. संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास यांच्या क्षेत्रातील अपर आयुक्त, आदिवासी विकास यांनी निवडलेले दोन मुख्याध्यापक. -सदस्य<br>➢ सदर योजनेच्या अंमलबजावणी प्रक्रियेमध्ये काही बदल किंवा सुधारणा करण्याचे अधिकार उपरोक्त समितीस राहतील.<br>➢ योजनेची अंमलबजावणी सुरू झाल्यापासून उपरोक्त समितीची बैठक दर ६ महीन्यांनी आयोजित करावी व सदर बैठकीमध्ये योजनेच्या प्रगतीचा आढावा घेण्यात याव तसेच योजना अंमबलजावणीमध्ये काही अडचणी असतील तर त्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.<br>सदर योजनेची अंमलबजावणी करताना व्हीडीओ व छायाचित्रे काढावीत व योजनेची अंमलबजावणी पुर्ण झाल्यानंतर योजनेचा फलनिष्पत्ती अहवाल शासनास सादर करण्याची जबाबदारी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांची राहील. |

| | | |
|---|---|---|
| १० | योजनेची अंमलबजावणीचा कालावधी | पहिला टप्पा - नोव्हेंबर २०१७ ते मार्च २०१८ ( अमरावती ATC मध्ये सुरवात )<br><br>दुसरा टप्पा - एप्रिल २०१८ - मार्च २०२१ ( नाशिक, ठाणे आणि नागपूर ATC मध्ये अंमलबजावणी ) |
| ११ | योजनेच्या अंमलबजावणी करीता सुचना. | **<u>शैक्षणिक घटक</u>**<br>१. विज्ञान विषयक घटकांची कार्य पुस्तिका ही सहज सोप्या भाषेत विद्यार्थ्यांना अवगत होईल अशी तयार करावी<br>२. पुस्तिका व पोस्टर्स तयार करताना ते जास्तीत जास्त चित्र स्वरुपात ,बोलकी, व उद्देश पूर्ण करणारी असतील या बाबत काळजी घ्यावी.<br>३. प्रत्येक तिमाहीत शिक्षकांसाठी वृत्तपत्र तयार करणार असल्याने प्रत्येक शाळेतील विज्ञान शिक्षकाने त्यांच्या शाळेत राबविलेले उपक्रम, नाविन्यपूर्ण बाबी , विज्ञान विषयात केलेले काम या बाबत माहितीचे संकलन करून ते सबंधित व्यक्ती/अधिकारी यांना वेळोवेळी देणे गरजेचे आहे.<br>४. दरवर्षी पुस्तकांचे व विज्ञान कोपऱ्यातील सामग्रीचे पुर्नभरण करण्यात येईल ह्याची काळजी घ्यावी.<br>५. ज्या माध्यमिक शाळांमधल्या मुलांना मूलभूत वाचन, लेखन आणि गणिती प्रक्रिया करण्यात अडचणी येतात त्या मुलांसाठी प्रगत शिक्षण कार्यक्रमांतर्गत विशेष कार्यक्रम घेऊन वर्षभरात त्यांना ते सर्व येईल ह्याची दक्षता घ्यावी ज्यामुळे त्या मुलांना विज्ञानाच्या संकल्पना समजण्यास मदत होईल.<br>६. स्थानिक गरजेनुसार शैक्षणिक आणि इतर सोयीची पूर्तता मुख्याध्यापकांनी करावी.<br>**<u>मनुष्यबळघटक</u>**<br>१. KRTs शोधण्यासाठी Ekalavya Foundation ने मदत करावी -<br>२. दहा आश्रमशाळांचे एक अशा प्रत्येक Cluster मधून एकची निवड करणे, २-३ रेकी भेटी, विभागीय माहिती स्त्रोत, शिक्षक प्रशिक्षणाच्या पहिल्या टप्प्यातून ५०-५५KRTs ची निवड एकलव्य फाऊंडेशन करेल.<br>३. शैक्षणिक व योजना प्रक्रियेच्या मदतीसाठी प्रकल्प कार्यालयातील तरुण व्यक्ती, MSTDA, Interns, Fellows यांची निवड करावी.<br>४. निवड केलेल्या KRTs ना त्यांच्या क्षमता वृद्धी साठी वाव देण्यात यावा.<br>५. आश्रमशाळांमधील सर्व रिक्त पदे भरली जातील ह्याची दक्षता घ्यावी.<br>**<u>प्रशासकीय घटक-</u>**<br><br>१. कार्यशाळा, प्रशिक्षणे , बैठका, शाळा-भेटी क्षमता वृद्धी भेटी/कार्यशाळांमध्ये सहभागी होणाऱ्या KRTs , शिक्षक आणि इतर कर्मचारी यांच्या प्रवास, जेवण, निवास इत्यादींसाठी विभागीय बजेटमध्ये तरतूद करावी.<br>२. बैठका , कार्यशाळा , प्रशिक्षणासाठी जाणाऱ्या शिक्षकांना पदमुक्त करण्यासाठी मुख्याध्यापकांनी कार्यवाही करावी<br>३. धारणी प्रकल्प कार्यालयात एकलव्य च्या ऑफिस साठी जागा देण्यात यावी दुसऱ्या वर्षी ४ ATC मध्ये ऑफिस साठी जागा देण्यात यावी. |

| | | |
|---|---|---|
| | | ४. ह्या योजनेतील तज्ञ व्यक्तींची ( Resource Person ) गरजेनुसार विभागीय किंवा शासकीय विश्राम गृहांमध्ये व्यवस्था करावी.<br>५. इतर सरकारी विभागांशी व संस्थांशी गरजेनुसार संपर्क करण्यात संस्थेस मदत करावी.<br>६. राज्यातील शिक्षण विभाग तसेच कॉलेज, विद्यापीठे व राज्यातील तसेच राज्याबाहेरील इतर संस्थांमधील महत्वाच्या व्यक्तींना कार्यशाळा, परिसर भेटी यांसाठी औपचारिक आमंत्रणे देण्यात यावीत.<br>७. इतर विभागातील व संस्थांमधील ज्या व्यक्ती शैक्षणिक व इतर इनपुट्स देऊ शकतील अशा व्यक्तींची प्रतिनियुक्ती करावी.<br>८. तक्रारी,सूचना व शंका निरसनासाठी हेल्पलाईन तयार करण्यात यावी.<br>९. प्रयोगशाळा, वाचनालय, माहिती तंत्रज्ञान यांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा शाळांमध्ये असतील ह्याची दक्षता घ्यावी.<br>उपरोक्त सुचनांच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याची जबाबदारी संबधित मुख्याध्यापक, प्रकल्प अधिकारी व अपर आयुक्त यांची राहील. |